वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी २०२५ पाने ४ किंमत ३

# परळीत १०९ अज्ञात मृतदेह सापडले



## खा.बजरंग सोनवणेंचा खळबळजनक दावा

बीड , (दिव्य न्युज):- परळीमध्ये १०९ अज्ञात मृतदेह सापडले असल्याचा खळबळजनक दावा खासदार बजरंग सोनवणे यांनी केला आहे. तर त्यांचा मर्डर झाला की त्यांना हृदयविकाराचा झटका आला, संदर्भात कोणतीही माहिती नसल्याचं देखील सोनवणे यांनी म्हंटलं आहे. खासदार बजरंग सोनवणे यांच्या या धक्कादायक दाव्यामुळे आता चर्चांना सुरुवात झाली आहे.

याविषयी बोलताना सोनवणे यांनी सांगितलं की, संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे केवळ ४ ते ५ घटना समोर आलेल्या आहेत. मात्र बीड जिल्ह्यात असे १०९ मृतदेह सापडलेले आहेत, ज्यांच्याबद्दल अद्यापही कोणती माहिती समोर आलेली नाही. या मृतांचा मर्डर झालाय की त्यांना हृदयविकाराचा झटका आला, याबद्दल कोणतीही माहिती मिळालेली नाही. मात्र अशा १०९ मृतदेहांचे पंचनामे करण्यात आलेले आहेत. याला बीड जिल्हयाबद्दल असलेली राजकीय उदासीनता जबाबदार आहे. राजकीय नेत्यांचा पाठिंबा असल्याने या घटना घडत असल्याचं नागरिकांचं म्हणण असल्याचं देखील बजरंग सोनवणे यांनी म्हंटलं आहे.

# वाल्मिक कराडला तुरुंगात व्हीआयपी असल्यासारख्या सुविधा

## पोलीस अधिकाऱ्यांचे नाव घेत देशमुख कुटूंबीयांचा आरोप

बीड, (दिव्य न्युज):- दोन कोटींच्या खंडणी प्रकरणात अटकेत असलेला आणि संतोष देशमुख हत्या प्रकरणात मुख्य आरोपी असल्याचा आरोप होत असलेला वाल्मीक कराड सध्या तुरुंगात आहे. वाल्मीक कराडलातुरुंगात विशेष व्यक्तीसारखी वागणूक मिळत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. धनंजय देशमुख यांनी हा आरोप केला असून, यापूर्वी भाजपचे आमदार सुरेश धस यांनीही हा मुद्दा उपस्थित केला होता. तुरुंगातील काही पोलीस अधिकाऱ्यांची नावे घेत आता देशमुख कुटुंबीयांनी आरोप केला आहे.

वाल्मीक कराडला बीडमधील कारागृहात ठेवण्यात आले आहे. यापूर्वीही वाल्मीक कराडला विशेष व्यक्तीसारखी वागणूक मिळत असल्याचा आरोप करण्यात आला होता. आता धनंजय देशमुख यांनी मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करण्याचा इशारा दिला आहे. वाल्मीक कराडला कोणत्या दिवशी किती वाजता कोणता अधिकारी वाल्मीक कराडला चहा आणि नाश्ता आणून देतो? कोणत्या दिवशी कोणत्या वेळी वाल्मीक कराड विशेष



खोलीत जाऊन बसतो. तिथून तो व्हिडीओ कॉन्फरन्सिद्वारे बोलणं होतं, असे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. धनंजय देशमुख यांनी एक पत्र तयार केले असून, त्यात वेळा आणि कर्मचाऱ्यांच्या नावांचाही उल्लेख करण्यात आला आहे.

वाल्मीक कराडला मोबाईल वापरण्याची सुविधा कर्मचारी सुधाकर मुंडेंनी दिली आहे. वाल्मीक कराड, जयराम चाटे, सिद्धार्थ सोनवणे यांना नियमबाह्य पद्धतीने एकाच बराकीमध्ये ठेवण्यात ▸▸ पान २ वर

Email:- dailydivyawarta@Gmail.com

दिव्य वार्ता

Email:-editordivyawarta@gmail.com

# पदभार देण्याचा माझा अधिकार,म्हणत सरपंचांनी ग्रामसेवकाला रोखले

## नेकनूर ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवकास पदभार घेण्यास विरोध

**नेकनूर, (दिव्य न्युज):- नेकनूर ग्रामपंचायतमध्ये दोन लाख रूपयाचा भ्रष्टाचार केल्याची तक्रार ग्रामपंचायत सदस्यांनी केलेली आहे. या प्रकरणात चौकशी सुरू असताना ग्रामसेवकाची बदली झाली. यानंतर गटविकास अधिकाऱ्यांनी दुसऱ्या ग्रामसेवकास पदभार देण्याचे आदेश काढले खरे परंतु सरपंचाने माझ्या ग्रामपंचायतीमध्ये पदभार देण्याचा माझा अधिकार आहे, असे म्हणत ग्रामसेवकास रूजू होण्यास विरोध दर्शवला आहे.**

नेकनूर ग्रामपंचायतमध्ये २ लाख रूपयाचा अपहार झाल्याच्या तक्रारीवरून चौकशी सुरू आहे. ही चौकशी सुरू असताना तत्कालीन ग्रामसेवकाची बदली झालेली असून याठिकाणी ए.बी. वाघमारे यांची नियुक्ती झाली आहे. नियुक्तीचे आदेश आल्यानंतर सदरील ग्रामसेवक कार्यालयात गेल्यानंतर सरपंच लांडगे यांनी त्यांना रूजू होऊ नका, म्हणत विरोध दर्शवला. केवळ तोंडीच नाही तर ग्रामसेवकाला लेखीही दिले असून यात 'सध्या मी ग्रामपंचायतीची अधिकृत प्रशासकिय अध्यक्ष/सरपंच व गावची प्रथम नागरिक आहे. आपण माझ्या ग्रामपंचायतमध्ये येऊन कोणतेही कामकाज करू नये, या ग्रामपंचायतमध्ये कुणाला पदभार द्यायचा तो सर्व अधिकार सरपंच म्हणून माझा आहे. तसेच मी यापुर्वी आपली बदली करावी म्हणून सीईओ, बीडीओ यांच्याकडे पत्र दिलेले आहे. मात्र, आपल्याला नव्याने ▸▸ पान २ वर

# उपमुख्यमंत्री शिंदें पाठोपाठ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनाही धमकी

मुंबई, (दिव्य न्युज):- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पाठोपाठ आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही धमकी मिळाली आहे. आणि ती देखील थेट पाकिस्तानी नंबरवरून. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयावर हल्ला करण्याची धमकी देणारा व्हॉट्सऍप मेसेज मुंबई वाहतूक पोलिसांना आला आहे. मुंबईतील वरळी पोलिसांनी हा मेसेज मिळाल्यावर लगेचच गुन्हा दाखल करत तपासाला

## पाकिस्तानी नंबरचा तपास सुरू

सुरुवात केली आहे. गेल्याच आठवड्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची गाडी बॉम्बने उडवण्याची धमकी देणारा ई-मेल पोलिसांना आला होता. हा मेल गोरेगाव, जे.जे. पोलीस स्टेशन,



सीएमओ आणि मंत्रालय येथे पाठवण्यात आला होता. या प्रकरणातील संशयिताला गोरेगाव पोलिसांनी ताब्यात घेतले. तर त्यानेच कथितरित्या मेल पाठवल्याचे तपासात समोर आल्याचे मुंबई गुन्हे ▸▸ पान २ वर

# शिवरायांचा महाराष्ट्र सुरक्षित राहिला पाहिजे

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी टोचले गृहमंत्र्यांचे कान

नांदेड, (दिव्य न्युज):- पुण्यात स्वारगेट बसस्थानक बलात्कार प्रकरणातील आरोपीला शिताफीने पकडण्यात आले आहे. त्याला योग्य ती शिक्षा होईलच; परंतु त्याच्यात ही विकृती आली कशी, याचा विचार केला पाहिजे. शिवराय, फुले-शाहू-आंबेडकरांच्या या महाराष्ट्रात महिला-भगिनी सुरक्षित राहिल्या पाहिजेत. पोलिसांनी कोणाच्याही दबावाला बळी न पडता कायद्यानुसार कर्तव्य बजावावे, अशा रोखठोक शब्दांत



राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी राज्याचे गृहखाते सांभाळणाऱ्या मुख्यमंत्र्यांचे शुक्रवारी येथे कान टोचले. ▸▸ पान २ वर

# आ.इद्रीस नायकवडी यांचा सोलापूर दौरा संपन्न

सोलापूर, (दिव्य न्युज):- सोलापूर जिल्ह्याचा एक दिवस दौरा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष तथा आमदार ईद्रीस नाईकवाडी संपन्न झाला यावेळी सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ने सबका राजा शिवाजी राजा कार्यक्रमाला उपस्थितीत लावली आणि अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केला व अनेक पदाधिकार्यांना नियुक्ती पत्र देण्यात आली.. यावेळी आमदार नायकवडी यांनी मार्गदर्शन ▸▸ पान २ वर



# रमजान नंतर बीडमध्ये प्यारे खान येणार



बीड, (दिव्य न्युज):- महाराष्ट्राचे अल्पसंख्याक आयुक्त यांचे सोबत मुंबई येथे आयुक्त कार्यालयात भेट झाली बीड जिल्ह्यात काही उर्दू माध्यमाचे संस्थाचालक यांचे तांडव चालू आहे यांचे सगळे कारणाने शिक्षक सोबत होणारे अत्याचार विद्यार्थी व पालक सोबत लूट व धोके मनमानी कारभार असे अनेक विषयावर चर्चा झाली हा सगळे विषय ऐकल्यावर प्यारे खान साहेब ने बीडमध्ये येऊन असे संस्थाचालकला धडा शिकविण्यासाठी रमजान नंतर बीडमध्ये येऊन संस्थाचालकला व यांना सहकार्य करणाऱ्याला कारवाई करण्यासाठी येत आहे जर कोणाचे अजून प्रश्न असे तर माझ्याशी भेट घेऊन पुरावे द्यावे असा आवाहन बीड अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघ चे जिल्ह्याचे अध्यक्ष सिद्दीक सर यांना केले.

# छत्रपती शिवरायांबद्दल विषारी गरळ ओकणाऱ्या प्रशांत कोरडकरला परळीत जोडो मारो आंदोलन

परळी, (दिव्य न्युज):- रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल विषारी गरळ ओकणा-या जातीयवादी प्रशांत कोरडकरच्या विरोधात परळीत जोरदार निदर्शने करण्यात आली. त्याच्या प्रतिमेस आंदोलकांनी जोडे मारून त्याचा जाहीर निषेध केला व राज्य सरकारने कोरडकरवर कडक कारवाई करण्याची मागणी केली.

याबाबत अधिक माहिती अशी की प्रसिद्ध इतिहासकार इंद्रजीत सावंत यांच्याशी मोबाईल वरून बोलत असताना जातीयवादी प्रवृत्तीच्या प्रशांत कोरडकर याने महाराष्ट्राची अस्मिता असलेले रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल अतिशय अपमानास्पद वक्तव्य केली या वक्तव्याचा महाराष्ट्र सह देशभर सर्वत्र निषेध होत आहे तसेच कोरडकरच्या विरोधात शिवप्रेमी रस्त्यावर उतरले आहेत.

परळी वैजनाथ येथे आज ▸▸ पान २ वर

# पोलीस अधिक्षक साहेब सदरक्षणाय की पवनचक्की रक्षणाय?

## महाराष्ट्र शासनाचा वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांवर पवनचक्की कंपन्यांकडून खोटा गुन्हा



बीड, (दिव्य न्युज):- पोलिस अधीक्षक नवनित कांवत यांनी सौर ऊर्जा प्रकल्प व पवन ऊर्जा प्रकल्पाच्या कामकाजाच्या संबंधाने स्थानिक राजकीय पुढारी, स्थानिक शेतकरी व गावगुंड यांच्याकडून विविध कारणांसाठी होणारी अडवणूक करून कामकाज बंद पाडणे किंवा खंडणीची मागणी करणे या अनुषंगाने प्रकल्पातील अशा होणाऱ्या घटनांना आळा घालण्यासाठी नोडल अधिकारी यांची नियुक्ती केली आहे. मात्र पवनचक्की कंपन्यांकडून शेतकऱ्यांची होणारी फसवणूक व दडपशाही याविरोधात शेतकऱ्यांनी शासन दरबारी लेखी तक्रार करून दाद मागण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावर गुन्हे दाखल होतात. जिल्हा प्रशासन त्यांची बाजु मुळात ऐकुनच घेत नाही. सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या बाबतीत बालाघाटावर अशा घटना घडलेल्या आहेत. यातच बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील महाराष्ट्र शासनाचा वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांवर पवनचक्की कंपन्यांनी खोटा गुन्हा दाखल केला असुन त्यांना न्याय कधी मिळणार?? पोलिस प्रशासन पवनचक्की कंपन्यांचीच केवळ पाठराखण करत असुन पिडीत शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली आहे.

बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील शेतकरी गणेश जगदाळे ▸▸ पान २ वर

# कलेक्टर साहेब असे केल्यास गुन्हेगारी थांबेल कशी ?

## उपविभागीय आयुक्तांनी हद्दपार न केल्याने २१ जणांनी केले गंभीर गुन्हे

बीड, (दिव्य न्युज):- दारू, वाळू, हातभट्टी, गुटखा माफियांसह इतर गुन्हे करणाऱ्यांची कुंडली काढून पोलिसांकडून त्यांना जिल्ह्यातून हद्दपार करण्यासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे (एसडीएम) प्रस्ताव पाठविला जातो; परंतु त्यांच्याकडून कारवाई केली जात नसल्याने हे प्रस्ताव धूळखात पडून राहतात. आपले काहीच होत नाही, असे समजून हे गुन्हेगार पुन्हा गुन्हे करत राहतात. अशाच ११८ प्रलंबित प्रस्ताव असलेल्या २१ गुन्हेगारांनी जीवे मारण्याचा प्रयत्न करणे, अवैध शस्त्र बाळगणे, जबरी चोरीसह इतर गंभीर गुन्हे केले आहेत. हद्दपार प्रस्तावांवर वेळीच करवाई झाली नाही तर गुन्हेगारी थांबेल कशी? असा प्रश्न आहे. त्यामुळे महसूल व पोलिस यांनी टोलवाटोलवी न करता समन्वयाने यावर सकारात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

जिल्ह्यात शांतता राहावी, म्हणून उपद्रवी लोकांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली जाते, तर अट्टल गुन्हेगारांना जिल्ह्यातून हद्दपार केले जाते. महाराष्ट्र पोलिस कायदा ५६ व ५७ अंतर्गत उपविभागीय अधिकाऱ्यांकडे (एसडीएम) गुन्हेगारांचे प्रस्ताव पाठवून मान्यता घेत गुन्हेगारांना जिल्ह्यातून हद्दपार केले जातेजे टोळी करून गुन्हा करतात अशांना महाराष्ट्र पोलिस कायदा ५५ अंतर्गत पोलिस अधीक्षक हद्दपार करतात. पोलिसांकडून सर्व गुंड, गुन्हेगारांची कुंडली काढली जाते. त्यानंतर हद्दपारीसंदर्भात कारवाई केली जाते.




### एसपींच्या रडारवर आणखी एक टोळी

दोन दिवसापूर्वीच केज तालुक्यातील रहिवाशी असलेली कोयता गँग बीडसह धाराशिव आणि लातूर जिल्ह्यातून हद्दपार केली होती.

आता मपोका ५५ अंतर्गत आणखी एका टोळीचा प्रस्ताव पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांच्याकडे आला आहे. त्यावरही आठवडाभरात हद्दपारीची कारवाई होणार आहे.

पोलिस अधीक्षकांकडून गतीने कारवाई केली जाते तशीच एसडीएम यांनीही करावी, अशी मागणी होत आहे.

### उपविभागनिहाय प्रलंबित प्रस्ताव




### काय आहे मपोका ५५, ५६ व ५७?

महाराष्ट्र पोलिस कायदा ५५ अंतर्गत पोलिस अधीक्षक गुन्हेगाराला हद्दपार करू शकतात.

**यात टोळीने गुन्हा केलेल्या आरोपींचा समावेश असतो. ५६ व ५७ अंतर्गत वैयक्तिक गुन्हा करणाऱ्यांना हद्दपार केले जाते.**

याचा प्रस्ताव पोलिस ठाण्याकडून उपविभागीय पोलिस अधिकारी, पोलिस अधीक्षक यांच्यामार्फत उपविभागीय अधिकाऱ्यांकडे पाठविला जातो.





“ **मपोका ५६ व ५७ चा प्रस्तावाला एसडीएमची मंजुरी आवश्यक असते. २०२४ मधील ११८ प्रस्ताव त्यांच्याकडे प्रलंबित आहेत. प्रस्ताव प्रलंबित असलेल्यांपैकीच २१ जणांनी गंभीर गुन्हे केल्याचे रेकॉर्ड आहे. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून बैठक घेतली जाईल. 'एमपीडीए'च्या प्रस्तावाबाबत तक्रार नाही.**

**नवनीत काँवत**, पोलिस अधीक्षक, बीड

### हद्दपार प्रस्ताव गेलेल्या २१ जणांनी कोणते गुन्हे केले ?

1. प्रलंबित असलेल्या ११८ पैकी २१ जणांनी पुन्हा गुन्हेगारी सुरूच ठेवली आहे.
2. यामध्ये जीवे मारण्याचा प्रयत्न करणे, दुखापत, गंभीर दुखापत, जबरी चोरी, चोरी, अवैध शस्त्र बाळगणे, अवैध दारू विक्री, गांजा विक्री, अॅट्रॉसिटी, जाळपोळ करण्यासारखे गुन्हे केले आहेत. सीसीटीएनएस विभागात या सर्वांची कुंडली आहे.
3. तसेच जिल्हा विशेष शाखेतून पोलिस निरीक्षक मुकुंद कुलकर्णी, सहायक पोलिस निरीक्षक सचिन इंगळे, हनुमंत वारे यांच्यासह टीमकडून गोपनीय माहिती काढली जात आहे.





“ प्रस्ताव प्रलंबित नाहीत. त्यावर योग्य ती कार्यवाही सुरू असते. जे प्रस्ताव पोलिस निरीक्षकांमार्फत आले, त्यांची चौकशी एसडीपीओंनी करावी लागते. ही न्यायिक प्रक्रिया असल्याने मी त्यांना आदेश करू शकत नाही; परंतु तरीही या प्रकरणांवर लवकरात लवकर कारवाई करावी, अशा सूचना सर्व एसडीएम यांना करतो.

**अविनाश पाठक**, जिल्हाधिकारी, बीड













पान १ वरून

## पदभार देण्याचा

पदभार घेण्याचे ग्रा. पं. सदस्य म्हणतात नेकनूर ग्रामपंचायतमध्ये मागील काळात भष्ट्राचार झाला असून त्याची चौकशी सुरू आहे. चौकशी सुरू असताना नवीन ग्रामसेवक याठिकाणी दिले आहेत. परंतु मागील काळातील चौकशी होऊ नये म्हणून सरपंचांनी ग्रामसेवकाने रूजू होऊ नये, अशी नोटीस दिली आहे. दरम्यान, नागरिकांची अनेक कामे खोळंबली असून गटविकास अधिकारी यांनी या प्रकरणी तोडगा काढावा, अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य सचिन शिंदे, जनाबाई राऊत, स्वाती काळे, सुजाता काळेसह सदस्यांनी म्हटले आहे.

आदेश राजकिय दबावापोटी झालेला असून तो मान्य नाही. गावातील नागरिकांची दैणदिन कामे, शासकिय कामे करण्यास मी सक्षम आहे, त्या कामात काही दिरंगाई झाल्यास मी जबाबदार राहिल, असेही पत्रात म्हटले आहे. पत्रावर पंच म्हणून चक्रधर शिंदे, शेख अली शफीयाद्दीन यांची नावे आहेत.

## वाल्मिक कराडला

आले आहेत, असाही आरोप करण्यात आला आहे. त्याचबरोबर तुरुंगातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात यावेत, अशी मागणीही देशमुख कुटुंबीयांनी केली आहे. या प्रकरणाची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करणार, असेही धनंजय देशमुख यांनी म्हटले आहे.

कोणत्या अधिकाऱ्यांवर आरोप?

तुरुंगातील बक्सर मुलाणी, ज्ञानेश्वर डोईफोडे, कृष्णा ढाकणे, सुधाकर मुंडे हे अधिकारी-कर्मचारी वाल्मीक कराडला सहकार्य करत आहेत.

## उपमुख्यमंत्री शिंदेंपाठोपाठ

शाखेने सांगितले होते. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना देखील धमकी आल्याने सर्व यंत्रणा ऍलर्ट मोडवर गेल्या आहेत.

मुंबई ट्रॅफिक पोलिसांना हा धमकीचा मेसेज व्हॉट्सऍपद्वारे मिळाला आणि तोही पाकिस्तानी नंबरवरून. बुधवारी दुपारी हा मेसेज मिळाल्यानंतर पोलीस एकदम सतर्क झाले आहेत. हा मेसेज पाठवणाऱ्याचे नाव मलिक शाहबाज हुमायूं राजा देव असे सांगितले जात आहे. हा मेसेज पाठवणारा व्यक्ती भारतात आहे की भारताच्या बाहेर आहे, याचा शोध घेतला जात आहे.

केंद्रीय गृह मंत्रालयाच्या सुरक्षा विभागाला पाकिस्तानी नंबरवरून आलेल्या या मेसेजची माहिती देण्यात आली आहे. महाराष्ट्र पोलीस आणि केंद्रीय गृह मंत्रालयाने या प्रकरणाच्या एकत्रित चौकशीस सुरुवात केली आहे.

गेल्याच आठवड्यात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची गाडी बॉम्बने उडवण्याची धमकी देण्यात आली होती. हा धमकीचा मेल गोरेगाव आणि जे.जे. मार्ग पोलीस स्टेशनसह अनेक सरकारी कार्यालयांना पाठवण्यात आला होता. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठवण्यात आलेल्या या धमकीच्या मेल प्रकरणी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३५१(३), ३५१(४), आयटी ऍक्ट आदी कलमांखाली गुन्हा दाखल केला होता.

तीन वर्षांपूर्वी मिळाली होती धमकी

२६/११ चा दहशतवादी हल्ला कोणताही मुंबईकर कधीच विसरू शकत नाही. अशाच प्रकारचा हल्ला २० ऑगस्ट २०२२ रोजी करण्याची धमकी देणारा मेसेज मुंबई पोलिसांना पाठवण्यात आला होता. तेव्हा २६/११ सारखा हल्ला करण्याची धमकी देण्यात आली होती.

## शिवरायांचा महाराष्ट्र

महायुती सरकारमध्ये दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाल्यानंतर आपल्या पक्षाच्या विस्ताराच्या निमित्ताने अजित पवार प्रथमच नांदेडमध्ये आले होते. नांदेड विमानतळावर त्यांचे आगमन झाल्यानंतर विमानतळ ते गुरूद्वारापर्यंत त्यांचे ठिकठिकाणी भव्य स्वागत करण्यात आले. सहा वेगवेगळ्या ठिकाणी क्रेनच्या माध्यमातून त्यांना अतिभव्य पुष्पहार घालण्यात आले. त्यानंतर ओम गार्डन मंगल कार्यालयात झालेल्या पक्षप्रवेश सोहळ्यामध्ये त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

आपल्या सुमारे ३५ मिनिटांच्या भाषणात अजित पवार यांनी पक्षाच्या नेते, कार्यकर्त्यांसह प्रसिद्धीमाध्यमांनाकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या. आपल्या बातम्यांमुळे आरोपी पकडण्यास मदत व्हावी, आरोपीला पळून जाण्याची संधी मिळू नये, असे वार्तांकन करण्याचा सल्ला त्यांनी माध्यमांना दिला. तर नेते व कार्यकर्त्यांना संबोधित करताना ते म्हणाले, महाराष्ट्र हा नेहमीच सुसंस्कृत राहिला आहे. विरोधकांना देखील सन्मानाने वागवण्याची आपली परंपरा आहे. कालच मराठी भाषा दिन साजरा झाला. प्रत्येक मराठी माणूस विचाराने कोणीही असला तरी तो महाराष्ट्राच्या हिताचाच विचार करणार, याची खूणगाठ प्रत्येकाने कायम मनाशी बांधली पाहिजे.

३ मार्च रोजी विधीमंडळाचे अधिवेशन सुरु होते आहे. यात दि. १० रोजी अर्थसंकल्प मांडला जाणार आहे. विरोधक लोकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण करीत आहेत. परंतु लाडक्या बहिणींसह सर्व समाजघटकांना मी आश्वस्त करतो की, गरीबांच्या हिताच्या कोणत्याही योजना बंद पडणार नाहीत, असे निसंदिग्धपणे सांगून पवार म्हणाले की, जे लोक आपल्या उत्पन्नातून कुटुंबाच्या गरजा भागवू शकत नाहीत, त्यांच्या मदतीसाठी सरकारचे प्रयोजन असते आणि सरकार आपले कर्तव्य चोखपणे बजावेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी गरजू समाज घटकांसाठी असंख्य योजना राबवत आहेत. कोट्यवधी लोकांना घरकुल देण्यात आले. तरुणांना रोजगार देणाऱ्या अनेक योजना आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र सरकार काम करत आहे.

मराठवाडा तहानलेला राहणार नाही

बाभळी बंधारा बांधताना अडचणी येत होत्या. परंतु लोकांचे हित लक्षात घेऊन आपण पुढाकार घेत तो मार्गी लावला. यापुढेही मराठवाड्याला पाण्याची कमतरता भासणार नाही, यासाठी आपले प्रयत्न असतील. नाशिक भागात पश्चिमेकडे पडणारे पावसाचे पाणी वाहून समुद्राला जाते, ते वळवून पूर्वेकडे महाराष्ट्रात आणले जाईल. त्यासाठी एक लाख कोटी रुपयांची योजना प्रगतीपथावर आहे.

## आ.इद्रीस नायकवडी

करतांना म्हटले की मी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चा एक कार्यकर्ता आहे पक्ष वाढवून माझी जवाबदारी आहे सर्व समाजाला सोबत घेऊन विकास काम करणार आहे.पक्ष वाढीसाठी मी महाराष्ट्र दौरा करणार असुन अनेक इतर पक्षांच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांची पक्ष प्रवेश साठी फोन येत आहे.लोकासाठी काम करणारे कार्यकर्त्ेयाना न्याय मिळवून देवू पक्ष वाढवु पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी.आगामी होणार्या महानगरपालिका नगरपालिका नगरपंचायत जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीसाठी तयार रहा असे आवाहन आमदार नायकवडी यांनी केले यावेळी पदाधिकारी ची भेटीगाठी घेतली पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या समस्या जाणून घेतल्या यावेळी सोलापूर शहराध्यक्ष अमिर शेख नजीर इनामदार व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थितीत होते

## छत्रपती शिवरायांबद्दल

दिनांक २८ फेब्रुवारी रोजी शिवप्रेमी तसेच आंबेडकर प्रेमी नागरिकांच्या वतीने सकाळी ११ वाजता राणी लक्ष्मीबाई टॉवर येथे जातीवादी प्रशांत कोरडकर च्या विरोधात जोरदार निदर्शने करण्यात आली तसेच त्याच्या प्रतिमेला आंदोलकांनी चप्पल व बुट मारून जाहीर निषेध केला तसेच राज्य सरकारने अशा प्रवृत्तींना ठेचून काढले पाहिजे अशा प्रकारची मागणी केली व फुले, शाहू, आंबेडकरांचा महाराष्ट्र महापुरुषांचा अपमान कदापिही सहन करणार नाही असा कडक इशारा यावेळी दिला.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते उत्तम माने, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते लुगडे महाराज, सामाजिक कार्यकर्ते अनंत इंगळे, ज्येष्ठ पत्रकार रानबा गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते सेवकराम जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते बाबा शिंदे,नितीन राव शिंदे, शिवाजीराव देशमुख, बालाजी काळे, मनसेचे तालुकाध्यक्ष श्रीकांत पाथरकर , प्राचार्य प्रा. अतुल दुबे,शहराध्यक्ष वैजनाथ कळसकर, दिनेशजी गजमल,केशव साबळे पाटील, एकतावादी रिपाईचे शहराध्यक्ष सुनील कांबळे, केशवराव मुंडे, भागवत साबळे, ज्येष्ठ नेते मुक्ताराम गवळी, महबूब कुरेशी, हरिभाऊ बुरकुले, पत्रकार निवृत्ती खाटीक, हनुमंत माने, भगवानराव काकडे आदी उपस्थित होते.

## पोलीस अधिक्षक साहेब

सांगतात आम्ही ७ जण भावंडे एकत्र कुटुंब पद्धतीत असुन आमच्या शेतालगत ९०० फुट अंतरावर फसवणूक करून पवनचक्की उभारण्यात आली आहे. अगोदर आम्हाला सौर ऊर्जा प्रकल्पाच्या प्लेटी लावणार असल्याचे सांगण्यात आले.नंतर रात्रीतुन मोठमोठ्या वाहनातुन पवनचक्की साहित्य आणण्यात आले.आम्ही अडवण्याचा प्रयत्न केला असता आमच्यावर पोलिस प्रशासनाकडून गुन्हे दाखल करण्यात आले. पवनचक्की कंपन्यांच्या कापर तारांमुळे जमिनीतील पाण्याची पातळी घटली. आमच्या शेतात सध्या शंभरच्या वर दुधदुभते जनावरे आहेत. पवनचक्की सुरू झाल्यावर आम्हाला सगळं सोडून जायची पाळी येणार आहे. आम्हाला सन २०१३ मध्ये महाराष्ट्र शासन कृषी व पणन विभाग सन्मानपत्र वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार मिळालेला आहे.गेल्या महिन्यात १३ जानेवारी दरम्यान बीड जिल्ह्यातील प्रगतशील शेतकरी असणाऱ्या ७ जणांना पुणे येथे नेण्यात आले होते.त्यात आमचा समावेश होता. मात्र पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभारामुळे आम्ही अडचणीत आलो असुन जिल्हा प्रशासन व न्यायालयात दाद मागत आहोत. आम्हाला न्याय कधी मिळणार??

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा आणि कामगार विभागाने दि.२१ आक्टोबर २०१३ रोजी पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय नियंत्रण समित्यांची स्थापना केलेली आहे. या समित्यांना पवन ऊर्जा प्रकल्पाशी निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहाराबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चितता तपासणे तसेच पवन ऊर्जा प्रकल्पाचे निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यावहारिक व मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे पवन ऊर्जा प्रकल्प बाबत समितीकडे आलेल्या तक्रारीची चौकशी करून त्यावर योग्य ती कारवाई करणे. आणि जिल्ह्यातील पवन ऊर्जा प्रकल्पाचे अनुषंगाने उद्धवणाऱ्या अडचणींचे निराकरण करणे. त्याचप्रमाणे शेतजमीन मालक ,शेतकरी आणि ग्रामस्थ आणि प्रकल्प विकासात यांच्यामध्ये समन्वय ठेवणे. प्रकल्प उभारणीसाठी व प्रकल्प कार्यरत राहण्यासाठी स्थानिक स्तरावर सर्व प्रकारचे सहकारी सहाय्य करणे इत्यादी अधिकार त्यांना दिलेले आहेत. पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आहेत तर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद आणि पोलीस अधीक्षक हे सदस्य आहेत. त्याचप्रमाणे तालुका स्तरावर सनियंत्रण समितीमध्ये उपविभागीय अधिकारी अध्यक्ष तर तहसीलदार समन्वयक अथवा सचिव आहेत .मात्र या समित्या केवळ कागदावर असून पवन ऊर्जा प्रकल्प संदर्भात शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे जिल्हा प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप शेतकरी करत आहेत. असे असतानाच पोलीस अधीक्षक बीड यांनी पवनचक्की व सौर ऊर्जा प्रकल्प अधिकाऱ्यांची पाठराखण करणे म्हणजे एक प्रकारे त्यांच्या मनमानी कारभाराला दिलेले सूट असून पिडीत शेतकऱ्यांना न्याय कोण देणार? पीडित शेतकऱ्यांचे तक्रारी कोण ऐकणार ? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.